पुणे पोलीस
Pune Police

जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक - ४५४ दिनांक - २२/०६/२०२३**

कोंढवा पोलीस स्टेशन,पुणे शहर

## पुणे शहरातुन तडीपार आरोपी आमिर ऊर्फ चिन्या हत्यारासह जेरबंद

कोंढवा पोलीस ठाणे हद्दीमध्ये पेट्रोलिंग करुन तडीपार व रेकार्डवरिल आरोपी चेक करण्याबाबत वरिष्ठ पोलीस निरीक्षक संतोष सोनवणे,पोलीस निरीक्षक (गुन्हे)संजय मोगले, पोलीस निरीक्षक (गुन्हे) संदिप भोसले यांनी सुचना दिल्या होत्या. सदर सुचनाप्रमाणे तपास पथक अधिकारी सहा.पोलीस निरीक्षक अनिल सुरवसे, व स्टाफ यांच्यासह चेक करित असताना,पोलीस अंमलदार सुहास मोरे, राहुल थोरात, राहुल रासगे यांना बातमी प्राप्त झाली की, पुणे शहरातुन २ वर्षा करिता तडीपार करण्यात आलेला आरोपी नामे १)आमिर ऊर्फ चिन्या आसीर खान,वय १९ वर्षे,रा.बुध्द विहार जवळ ग.नं.९ काकडेवस्ती कोंढवा,पुणे हा घरी आला असुन तो बुध्द विहार समोर लोखंडी हत्यार कमरेला लावुन उभा आहे. बातमीच्या ठिकाणी अलीकडे थांबुन खात्री करता बुध्द विहारच्या समोर आरोपी हा कोणाची तरी वाट पाहत असल्याचे दिसले.

सदर आरोपी यास ताब्यात घेणेकामी गेलो असता तो स्टाफला पाहुन पळुन जाण्याचा प्रयत्न करु लागला.त्यास ताब्यात घेवुन त्याचे नाव पत्ता विचारता त्याने त्याचे नाव पत्ता **१)आमिर ऊर्फ चिन्या आसीर खान,वय १९ वर्षे,रा.बुध्द विहार जवळ ग.नं.९ काकडेवस्ती कोंढवा,पुणे** असे असल्याचे सांगितले.त्यास तु तडीपार असुन देखील कसा काय येथे आला आहेस? तु कोंढवा अगर पुण्यामध्ये येण्याकरीता मा.न्यायालयांची अगर मा.पोलीस उप आयुक्त परी ५ पुणे शहर यांची पुर्व परवानगी घेतली आहे काय? याबाबत विचारणा करता त्याने कुठलीही परवानगी घेतली नसल्याचे सांगितले. त्याच्याकडे चौकशी करत असताना तो त्याच्या कमरेच्या आत काही तरी लपवित असल्याचे दिसले.तेव्हा मिळालेल्या बातमी प्रमाणे त्याने लोखंडी हत्यार जवळ बाळगल्याचा संशय आल्याने त्याची झडती घेतली असता त्याच्या अंगझडतीत लोखंडी हत्यार मिळुन आले आहे.सदर आरोपी याच्या विरुध्द महाराष्ट्र पोलीस करूादा कलम.१४२, भारतीय हत्यार कायदा कलम ४ (२५) व महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७ (१)(३)सह १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर कारवाई मा.अपर पोलीस आयुक्त पुर्वे प्रादेशिक विभाग,श्री.रंजन शर्मा, मा.पोलीस उप आयुक्त परि.०५ श्री.विक्रम देशमुख, मा.सहा.पोलीस आयुक्त वानवडी विभाग श्री.एस.बी.साळवे यांच्या मागदर्शनाखाली पोलीस अंमलदार अमोल हिरवे,सुहास मोरे,राहुल थोरात,गणेश चिंचकर,अभिजीत रत्नपारखी,राहुल रासगे,विकास मरगळे,राहुल वझारी यांनी केली आहे.